## प्रेस नोट

ला.प्र.वि, जळगाव

दि.१५/०४/२०२६

**महाराष्ट्र शासन कामगार विभाग, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ महाराष्ट्र राज्य मुबंई यांच्या शासनाच्या योजनेअतंर्गत गृह उपयोगी संच वाटप करणाऱ्या कर्मचारी आसमा परवीन शेख इरफान (इतर लोकसेवक) वय. ३८ वर्ष, रा.शिवाजी नगर जळगाव यांचेवर यशस्वी सापळा कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | जळगाव |
| **फिर्यादी** | रेश्मा चंद्रकांत अवतारे, वय ३५ वर्षे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., नंदुरबार, कॅम्प—ला.प्र.वि. जळगाव |
| **पोलीस ठाणे व गुन्हा नोंद कमांक** | एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशन जि.जळगाव गु.र.नं. /२०२६. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **लाचेची मागणी रक्कम** | १००/— रूपये. |
| **तंडजोडअंती स्विकारलेली रक्कम** | १००/— रूपये. |
| **घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेली रक्कम** | **४१,२५०/— रोख रक्कम (त्यात ५००, २००, १००,५० रू. दराच्या नोटा.) (आरोपी महिला बसत असलेल्या टेबलाखाली असलेल्या पत्राच्या पेटीमध्ये लाभार्थी यांना गृह उपयोगी संच ताब्यात देण्यासाठी त्यांची केवायसी करण्याचे मोबदल्यात लाभार्थीकडुन लाच म्हणुन स्विकारलेली रक्कम.)** |
| **थोडक्यात हकिगत** | मुळ तक्रारदार हे जळगाव येथील रहिवासी असुन त्यांनी महाराष्ट्र शासन कामगार विभाग, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ येथे शासनाच्या योजनेअतंर्गत गृह उपयोगी संच मिळणेकरीता दि.०९/०४/२०२६ रोजी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्यानुसार दि.१५/०४/२०२६ रोजी गृह उपयोगी संच ताब्यात घेण्यासाठी चिंचोली ता.जि.जळगाव या ठिकाणी हजर राहणेबाबत पत्र प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे तक्रारदार हे गृह उपयोगी संच ताब्यात मिळणेकामी गेले असता त्यांनी सदर संच वाटप केंद्रावरील तब्बसुम शेख यांची भेट घेतली असता, त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना महिला आरोपी आसमा परवीन शेख इरफान (इतर लोकसेवक) यांना भेटण्यास सांगितले. म्हणुन तक्रारदार हे आरोपी महिला आसमा परवीन शेख इरफान (इतर लोकसेवक) यांची भेट घेतली त्यावेळी आसमा शेख यांनी तक्रारदार यांना, गृह उपयोगी संच ताब्यात घेण्यासाठी तुमची केवायसी करावी लागेल व त्यासाठी तुम्हाला १००/— रूपये दयावे लागतील, असे सांगुन त्यांनी तक्रारदार यांचेकडे १००/— रूपये लाच मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी महिला आरोपी आसमा परवीन शेख इरफान यांचेविरूध्द दि. १५/०४/२०२६ रोजी ला.प्र.वि., जळगाव यांचेकडे तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दि. १५/०४/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता महिला आरोपी आसमा परवीन शेख इरफान (इतर लोकसेवक) यांनी तक्रारदार यांचे गृह उपयोगी संच ताब्यात देण्यासाठी केवायसी करून दिल्याचे मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष १००/— रूपये लाच मागणी करून ती स्विकारण्यास संमती दर्शविली होती.<br>यशस्वी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार चिंचोली येथील गृह उपयोगी संच वाटप होत असलेल्या ठिकाणी गेले असता महिला आरोपी आसमा परवीन शेख इरफान (इतर लोकसेवक) यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडुन १००/— रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली, म्हणुन यांचेविरूध्द एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याचे कामकाज सुरू आहे |
| | **पर्यवेक्षण अधिकारी** — श्री.योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगांव.<br>**सापळा अधिकारी** — श्रीमती रेश्मा चंद्रकांत अवतारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,नंदुरबार, कॅम्प—ला.प्र.वि. जळगांव.<br>**सापळा पथक** — श्रेपोउपनिरी.सुरेश पाटील, पोहेकॉ/बाळु मराठे, पोकॉ/राकेश दुसाने, पोकॉ/प्रदिप पोळ, सर्व नेम.ला.प्र.वि.जळगांव<br>**तपासी अधिकारी** — श्रीमती स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव |

| | |
|---|---|
| मार्गदर्शन | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र नाशिक येथे सपंर्क करावा.

सपंर्क पत्ता :– ला.प्र.वि.कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव

संकेतस्थळ :– acbmaharastra.gov.in

ई मेल/ऑनलाईन तक्रार :– spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com

टोल फ्रि क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२५७–२२३५४७७

व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक :– ७५८८६६१०६४

**योगेश जी.ठाकूर**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**